# <u>स्वरूप सुंदर रुप गणेशाचे</u>

स्वरूप सुंदर रुप गणेशाचे
मनमोहवी याचे किती गुण गावे
कथा न्यारी आहे याच्या जन्माची
प्रगती त्यातुनी जे व्यर्जिले उमेने

मुख लपले हे नासिकेने
मौन राखुनिया ओळखी गंधाने
विद्येचा हा देव व्यासाचा लिपिक
मस्तक झुकते अती लीनतेने

महाकाय देई मूषका शरण
धरूया चरण दयेच्या देवाचे
लंबोदर आहे क्षमाशील देव
पोटी अपराध घाली भक्तांचे

गरजे आधी देई दान भक्तास
याच्या पाशी काही मागावे न लागे
देव अधिपती असा हा देव
आपोआप कर जुळती आमचे